# प्रवासी वाहतूक कंपन्यांसोबत अ‍ॅटम टेक्नॉलॉजिसचा करार

**प्रतिनिधी**

मुंबई, रविवार - अ‍ॅटम टेक्नॉलॉजिस कंपनीने मोबाईल पेमेंट करण्याचे एम-पेमेंट माहिती तंत्रज्ञान पुरविण्यासाठी सुमारे २५ ट्रॅव्हल कंपन्यांसोबत करार करणार आहे. हे करार विमान वाहतूक कंपन्या, टूर ऑपरेटर, ऑनलाईन ट्रॅव्हल एजंट, हॉटेल्स यांना मोबाईल पेमेंट सोल्यूशन्सचा पुरवठा करण्यासाठी केले जातील. सध्या फ्लाय क्रेझी, ऑक्सवर्ड ट्रॅव्हल्स, तिकिटवाला आदी कंपन्या अ‍ॅटमच्या तंत्रज्ञानाचा वापर करीत आहेत. मार्च २००९ पर्यंत कंपनीने १० लाख ग्राहक जोडण्याचा संकल्प सोडला आहे तसेच श्रीलंकेत मुसंडी मारली जाणार आहे.